
मकर संक्रांत १९२३

# युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०१९




5 And the LORD came down to see the city and the tower, which the children of men builded.
6 And the LORD said, Behold, the people is one, and they have all one language; and this they begin to do:
and now nothing will be restrained from them, which they have imagined to do.
7 Go to, let us go down, and there confound their language, that they may not understand one another's speech.
8 So the LORD scattered them abroad from thence upon the face of all the earth:
Genesis Chapter 11.

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

वर्ष ७४ वे

जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०१९

# युगवाणी

**संपादक**

प्रफुल्ल शिलेदार

**संपादक**
प्रफुल्ल शिलेदार

**मुखपृष्ठ क्र.** १, २, ३ वरील चित्रे सुधीर पटवर्धन यांच्या 'बिल्डिंग होम, एक्सप्लोरिंग द वर्ल्ड' या तीन भागाच्या सलग चित्राचे (Triptych) भाग आहेत. या चित्रावर आधारित विशेष लेख पृष्ठ क्र. ३० वर आहे.
आतील रेखाटने : राजू बावीस्कर
इतर छायाचित्रे आंतरजालावरून व लेखकांच्या व्यक्तिगत संग्रहातून साभार
**मुखपृष्ठावरील सुलेखन :** चंद्रमोहन कुलकर्णी

**संपादकीय पत्रव्यवहार**
प्रफुल्ल शिलेदार, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर – ४४० ०१५
ई-मेल : edityug@gmail.com

**प्रकाशक**
विलास मानेकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

**जाहिरात सहयोग :** प्रदीप दाते, वर्धा

**मुद्रितशोधन :** दीपक रंगारी

**अक्षरजुळणी व मुद्रण :**
माधव लोखंडे, मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर । भ्रमण : ९३२६९९९०१५

**युगवाणीच्या वर्गणीबाबत सूचना :**
- युगवाणीची वर्गणी आपण 'युगवाणी-विदर्भ साहित्य संघ' या नावाने धनादेशाद्वारे पाठवू शकता.
- युगवाणीची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.

Bank Account :
**'YUGWANI-VIDARBHA SAHITYA SANGH'**
Bank of Baroda, Sitabuldi Branch, Nagpur
**A/c. No.: 04650100 005638**
RTGS/IFSC Code : BARB0SITABU
Fifth Character is 'ZERO'

- युगवाणीची वर्गणी संपली असल्यास नूतनीकरण अवश्य करावे.

**व्यवस्थापन :**
**वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :**
नितीन सहस्रबुद्धे, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२ । भ्रमणभाष : **९४२३१०३३०१**

**प्रकाशनाची कालनियतता :** त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

**या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये**
**वार्षिक वर्गणी : २०० रुपये, त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये**
**वि.सा. संघाच्या आजीव सभासदांना युगवाणीचे अंक मिळण्याकरिता विशेष सवलतीत त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये भरणे गरजेचे आहे.**

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

# यु ग वा णी । जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१९

## अं त रं ग


***कविता***
रमेश इंगळे उत्रादकर/५
इंद्रजित भालेराव/७
रफिक सूरज/१०
योगिनी सातारकर-पांडे/१२

***दृश्यकला :***
**सुधीर पटवर्धन यांची मुलाखत** : संजय गणोरकर/१४
**सुधीर पटवर्धनांच्या चित्रांमधला काळ आणि अवकाश** : दीपक घारे/३०

***जन्मशताब्दी विशेष :* त्र्यं. वि. सरदेशमुख**
आऊटसायडर : नितीन वैद्य/३६
त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे कादंबरी-त्रय : माणूसधर्माचे आख्यान : संजय आर्वीकर/४४

***पुनर्वाचन :***
**कादंबरी : ऐतिहासिक व नैतिहासिक :** त्र्यं. वि. सरदेशमुख/६०

***वाचकाची टिपणवही :***
**सारखेपणातील निराळेपण** : नितीन रिंढे/६४

***आत्मकथन*** *(क्रमशः)*
**काळ्या निळ्या रेषा :** राजू बावीस्कर/७४

***कवितांतर :***
**भारतीय इंग्रजी कविता** /८७
निस्सीम इझिकेल, ए. के. रामानुजन, केकी दारुवाला, जयंत महापात्रा, डॉम मोरेस,
इम्तियाज धारकर, अरविंद कृष्ण मेहरोत्रा
**टिपण व अनुवाद :** दीपक बोरगावे

विदर्भ साहित्य संघ कार्यवृत्त/१०२

# संपादकीय...

**कला** आणि व्यापार यांच्यातल्या संबंधाचे स्वरूप काय आहे, ते कसे असावे, असावे की नसावे याबाबत दीर्घ काळापासून चर्चा घडत आल्या आहेत. कलेने व्यापाराशी गाठ बांधून वाटचाल करावी काय, तसे केल्यास कला ही कला उरेल काय, अशी भीती अनेकदा व्यक्त केली जाते. कलावंताने आजच्या जगात व्यावसायिक वृत्तीने राहणे गरजेचे आहे काय, व्यापाराशी सांगड न घातली तर कलावंत जगावा कसा, असे प्रश्न अनेकदा उपस्थित होतात. साधारण परिस्थितीत किंवा हलाखीच्याही परिस्थितीत जगणारा कलावंत या जगातून निघून गेल्यानंतर त्याच्या कलेला कधी अचानक प्रचंड मूल्य प्राप्त होते; असे मूल्य त्या कलावंताच्या कलेला तो जिवंत असताना का मिळाले नाही, असेही प्रश्न मग उपस्थित केले जातात. कलावंताचे जगण्याचे मार्ग आणि कलेचे मार्ग वेगवेगळे असतात काय? या सगळ्या गुंतावळीतून प्रत्येक कलावंताला आपापला मार्ग काढावा लागतो. खरे तर आपल्या स्वाभाविक आणि नैसर्गिक अंतःप्रेरणेने कलावंत जगत असतो. त्यात त्याला काय साधले याचा विचार नंतर होतो. एम. एफ . हुसेन, वासुदेव गायतोंडे यासारख्या श्रेष्ठ चित्रकारांची किंवा गजानन माधव मुक्तीबोध यांच्यासारख्या लेखकाची किंवा अनेक गायक, वादक, अभिनेते, लोककलावंतांची चरित्रे या संदर्भात आपल्यापुढे अनेक प्रश्न उभे करतात. कला ही आपले माणूसपण अधोरेखित करणारी गोष्ट असली तरीही कलावंतांच्या जगण्याच्या अशा प्रश्नांना धीटपणे सामोरे जाऊन सामाजिकदृष्ट्या यातून काही व्यवस्थात्मक मार्ग काढणे अजून तरी आपल्याला शक्य झालेले दिसून येत नाही. हे वास्तव स्वीकारून या अंगाने पुढे काही निष्पन्न होण्यासाठी चर्चा होणे गरजेचे आहे.

या अंकातील विख्यात चित्रकार सुधीर पटवर्धन यांच्या मुलाखतीतून इतर अनेक गोष्टींसह कलाविश्वाचा एका व्यापक परिप्रेक्ष्यातून विचार केलेला आपल्याला दिसून येतो. कला आणि कलाविश्व, माणूस आणि समाज, निर्मिती आणि व्यापारी जग यातील आंतरसंबंध बदलत राहातात आणि काळाच्या प्रत्येक टप्प्यावर ते तपासणे गरजेचेच असते. चित्रकलेतील बदलत्या कलाविश्वाने आता कसे रूप धारण केलेले आहे याचा अंदाज आपल्याला सुधीर पटवर्धनांच्या बोलण्यातून येतो. अभिव्यक्तीची रूपे आणि कलेची साधने व माध्यमे बदलत आहेत. कलामाध्यमांची एकमेकांत सरमिसळ होत आहे. द्विमितीय अभिव्यक्ती आता त्रिमित होऊन काळाशी सांगड घालू लागलेली आहे. थोडा विचार केला तर असेच बदल साहित्यासह इतर कलांच्या बाबतीतही झालेले आपल्याला दिसून येतात. मात्र या सगळ्यांत कलेचे प्रयोजन आणि कलेमागील भूमिका कुठे हरवून जाऊ नये हे पाहणे गरजेचे आहे. तसेच कलेत ज्या प्रमाणात बदल घडत असतात त्या प्रमाणात समाजात सजगपणा येण्यासाठीही प्रयत्न होणे गरजेचे असते. ही जबाबदारी अनेकदा कलावंत स्वतःच्या अंगावर घेतो किंवा इतर स्तरावरून प्रयत्न होतात त्या वेळेस अशा प्रयत्नांना मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळणे गरजेचे असते. हा विचार करत असताना जीवन आणि कला यातील नाते विकसित होत जाणे महत्त्वाचे आहे.

इंग्रजी ही आपल्याकरिता परकी भाषा असली तरीही ती एक मोठी ज्ञानभाषा आहे आणि भारतीय समाजाने तिला केवळ व्यवहाराचीच भाषा म्हणून नव्हे तर अभिव्यक्तीची भाषा म्हणूनही स्वीकारले आहे हे लक्षात घ्यायला हवे आणि या भाषेतील निर्मितीकडेही भारतीय साहित्याच्या परिप्रेक्ष्यातून बघायला हवे. या वर्षी दिला गेलेला भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार इंग्रजीतून लेखन करणाऱ्या भारतीय साहित्यिकाला दिला गेला ही गोष्ट सूचक आहे. या अंकातील भारतीय इंग्रजी कवितेचा विभाग वाचकांना या दृष्टीने महत्त्वाचा वाटेल अशी आशा वाटते.

त्र्यं. वि. सरदेशमुख हे मराठीतील चिंतनशील कादंबरीकार, महत्वाचे समीक्षक आणि अनुवादक होते. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या लेखनावर केंद्रित एक विशेष विभाग या अंकात देऊन आम्ही त्यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना अभिवादन करीत आहोत.

**– प्रफुल्ल शिलेदार**

कविता

# रमेश इंगळे उत्रादकर यांच्या कविता



### आणि आणखी एक

दुर्धर व्याधीने जर्जर असल्यासारखा
अस्थिपंजर सूर्य उगवतो
निराश हताश उमेदीवर
रोगट पिंगट प्रकाश पसरतो
खंगलेले पेंगलेले कोंबडे बांग देत नाहीत
भिरूड लागून जीव पोकळ झालेली झाडं
कण्हत कण्हत उठतात
उदास भकास भूपाळी गुणगुणत
पाखरं पंखांवरची धूळ झटकतात
कुणीतरी ढकलून दिल्यासारखा अनिच्छेने
निष्पर्ण झाडीतून विकलांग वारा वाहतो
बेरीबाभळींच्या तीक्ष्ण झुडपांतून
फुलपाखरांचे पंख फाटण्याचा आवाज येतो
खपाट कळपाची वाट पाहणाऱ्या
खुरट्या गवताच्या करड्या माळावर
सुनसान आकाशातून गिधाडे उतरतात
अवजड सावज गिळलेल्या अजगरासारख्या
पायवाटा सुस्त पडून असतात
निर्मनुष्य रस्त्यांवरच्या धुळीत
दारुण शांततेची पावले उमटतात
तुडुंब खिन्नतेनं काठोकाठ भरून
ठार कोरडी नदी वाहते
काठाकाठाने विषण्ण टिवटिव करत
एक टिटवी उडत राहते
सांज होते रातकिडे स्वरयंत्रे परजून सज्ज होतात
दिव्यांच्या पोटात उजेडाच्या भयाने डोंब उसळतात
मनातले चांदणे लपवत चंद्र
अट्टल चोरासारखा ढगात पसार होतो
आणि आणखी एक
निर्घृण निगरगट्ट दिवस मावळतो

• • •

### आणि नंतर काहीही

ही ठणक अशीच हाडात ठाण मांडून
पसरत राहिली सांध्यासांध्यांत
ही पीडा अशीच पाचवीला पुजल्यासारखी
प्राणांतिक पिच्छा पुरवत राहिली
हे उदासीचे झाड असेल अस्ताव्यस्त वाढत
मुळांच्या कैचीत रक्तवाहिन्या गुंतवत राहिले
प्रहरांच्या गळ्यात गळा घालून कंटाळा
असाच देहभान हरपून वावरत राहिला
कोंडी फुटली नाही आणि ही घुसमट अशीच
कमकुवत श्वासांना बेमुर्वत घेरत राहिली

तर एक दिवस हमखास
हा सूर्य रोजच्यासारखा उगवणार नाही
मुंग्या लागतील स्थितप्रज्ञ लक्षणांना
वज्रनीतीचे नवनीत होईल
निग्रह खिळखिळे होऊन पडतील धारातीर्थी
अतुलनीय धैर्याचे धिंडवडे निघतील
सहनशीलतेचा अंत होईल दयनीय
आणि नंतर काहीही घडू शकेल
शब्दांच्या पलीकडले
अविश्वसनीय

• • •

## आणि उसकून गिळेलच

घट्ट शिसवी मांड ठोकून
कितीही स्वार झालेत जगण्यावर
हे लोचे ह्या कटकटी
हे करकचून आवळणारे नियम
ह्या गुदमरवून टाकणाऱ्या अटी
कितीही हिंस्र चाल करून
आल्यात संकटांच्या झुंडी
झडप घालण्यास टपून
कितीही दबा धरून बसलेत
हे अघटितांचे कळप
दुर्दैवाने कितीही निर्दयतेने
दावणीला बांधले दिवस
तरीही डगमगू नको
धीर धर
कच खाऊ नको
तग धर

वाळू सरकेलच
पाय आणखी खोलात जाईल
संयमाचे प्रशांत पात्र
निःसंशय प्रक्षुब्ध होईल
वैफल्याचे तण माजून
तालेवार होईल पठार
अलवार देहाला
श्वासांचाही भार होईल
म्हणून सर्वकाही
संपल्यातच जमा होईल
असे नाही

सर्वनाशाच्या ग्रहणाची
कितीही ठिक्कर छाया पसरली
तरी अनित्यतेची किमया
संपता संपत नाही कधीच
कभिन्न काळोखाचे कवच भेदून
उसळणारा एखादा किरण
असतोच गर्भसंभवाच्या प्रतीक्षेत
तो रुजेल अंकुरेल कधीतरी
आणि उसळून गिळेलच
सगळ्या वाताहतीला
त्याच्या तारक संहारक प्रसूतीवर
विश्वास ठेव
धीर धर
तग धर.

• • •

## आणि ग्रहवासे तेवढे

कायम ब्रह्मानंदी टाळी लागल्यासारखी पारमार्थिक चर्या
मिथ्या मेटाकुटीत असून नसल्यासारखा पारलौकिक वावर
नाळ सज्जनांच्या कुळाशी भिडलेली थेट
नात्यांचे पदर साधुसंतांच्या वंशावळीत पसरलेले

बृहद् बेहोशीत धुंद अवलिया शतप्रतिशत तुटला
पण सुटला नाही वर्तुळाच्या अजब न्यायातून
कुंडलीने कूस बदलली विधिलिखित उजागर झाले
की अचानक उठून उभी राहिलीत सटवीची अक्षरे
काहीच कळले नाही, सुगावे धागेदोरे नाहीत
फक्त फिरलेले ग्रह आणि वासे तेवढे लागलेत हाती
भविष्याच्या जिभेला बरबादीच्या जहराचे बोट लागले

त्याने खरवडून पणाला लावली संचिताची सगळी खोळ
आस बाळगली कर्मविपाकाच्या मंगल फलश्रुतीची
देवाला सुकृताचा सश्रद्ध भारा वाहिला
अनुकूल कौल मागून पाहिला दैवाला
अखेर बोलून पाहिला निर्वाणीचा
नियतीच्या घरी पाणी भरण्याचा नवस

परंतु दिवस तसेच करवती दातांच्या किरणांनी उगवत राहिले
चक्रवाढीने चढतच राहिला यातनांचा ज्वर
आशा वांझ वेणा देत नुसतीच विव्हळत राहिली
प्राक्तनाच्या वृंदावनातले तुळशीपत्रही हलले नाही.

• • •

---

▪ **रमेश इंगळे उत्रादकर ।** शिक्षक कॉलनी, जिजामाता नगर, बुलडाणा – ४४३ ००१ । भ्रमणभाष : ९८६०५५८३३१

## कविता

# इंद्रजित भालेराव यांच्या कविता



■

### उन्हाळा

ना मी बळी ना बळीराजा
ना मी कुणाचा पोषक
ना शोषक
आपण सर्वांनी मिळून
ठरवलं होतं
करायची ही कुणबीक
वाटून घेतली होती कामं
ज्याची त्यानं
आपापल्या खुशीनं
हिस्साही घेतला होता वाटून
आपापल्या कष्टाचा
पाहिजे कुणीतरी कारभारी
व्यवहाराला
म्हणून माझ्या गळ्यात टाकलं
ते लोढणं
सगळ्यांनी सहकार्याची
बोली करून
बारा बैलांचा लोखंडी फाळांचा
नांगर लावून
उलथली जमीन ओसाड
पिकवला पसा घेतला वाटून
बरं चाललं बराच काळ
दुकाळ आला अनेकदा
तेव्हा वाटू घेतला उपासही
पसा-पसा
काळ बदलत गेला
दुष्काळ वाढत गेला
बदलू मनलं खांदा
आलटून पालटून
तर चढवलं मला
हरभऱ्याच्या झाडावर
बाबापुता करून
कधी बळीराजा
कधी जगाचा पोशिंदा
माय घेती गोडीगोडीनं
करून काम
कंटाळलेल्या लेकराकडून
तसं केलं सगळ्यांनी
आज झाले पर्याय तुम्हाला खुले
तर हे लोढणं
तसंच माझ्या गळ्यात ठेवून
पळाले सगळे दूर दूर
मला सोडून
बोंगाळलेल्या बैलाच्या नावानं
कुणबिकीचा घालून
रहीमल दुला
मला कुठं जाता येईल?
मला बांधून
खडकावरच्या खुट्याला
तुम्ही चाललात ढांभा चरायला
किती दिवस पुरलं ढांभा?
हा रडीचा डाव
बारा नाही गड्याहो
जीव लावलेली पाखरंही
जातातच उडून संपली सुगी की
आता पाखरं म्हणतील